"आपले मंडळ"

|| Maharashtra Mandal of Detroit ||

# स्नेहबंध



महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ

## संक्रांत विशेषांक

फेब्रुवारी २०१८

Avinash, Hema, Ruchi, Akash and Adarsh Rachmale



# The N. Rachmale Foundation

**Prosperity Through Service**

Avinash and Hema Rachmale

SKY Group Inc.
Sky Group Grand, LLC.
Real Estate Group

LAKESHORE HEALTHCARE GROUP
LHG
Lakeshore Healthcare Group, Inc.
Nursing Home & Managed Care

LAKESHORE GLOBAL
Lakeshore Global
Infrastructure Contractors

www.therachmalefoundation.org | www.Lgccorp.com

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्षीय | अनघा हुपरीकर | पान 3 |
| २ | झोका आठवणींचा | स्नेहबंध संपादक मंडळी | पान 5 |
| ३ | जाने कहाँ गये वो दिन...... | संजय मेहेंदळे | पान 6 |
| ४ | असा कधीही यावा | सुरेश नायर | पान 8 |
| ५ | मी आयुष्यात एकदा (च) मोर्चात भाग घेतला होता | वीणा शाह | पान 9 |
| ६ | असा(ही) एक सिलसिला/ रंग संक्रांतीचे | पल्लवी सप्रे | पान 12 |
| ७ | मिले सूर हमारा तुम्हारा..... | सौ. सरोज प्रशांत जावकर | पान 15 |
| ८ | पहिली हिमवृष्टी आणि धारिणीची रजई | ऋतूज देशपांडे | पान 17 |
| ९ | मायबोली कट्टा: मराठी साहित्याच्या गप्पांचा छोटासा कट्टा | मायबोली कट्ट्याचे सभासद | पान 18 |
| १० | Pen it! | Mansi Dahanukar | पान 20 |
| ११ | The Mesmerizing Era of Romance – 90’s | Reshma Upasani | पान 22 |
| १२ | पत्रपल्लवी | ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर | पान 24 |
| १३ | अमादक पेयाची मादक किमया ...... | शमा सुखटणकर | पान 27 |
| १४ | Indira's Emergency, Gandhiji and I | Anonymous | पान 29 |
| १५ | आठवणी रेडिओ आणि टीव्हीच्या | अर्चना जगताप | पान 31 |

# अध्यक्षीय

## नमस्कार मंडळी,



नवीन वर्षाच्या आणि संक्रांतीच्या तुम्हाला सर्वांना खूप शुभेच्छा!!
नवीन वर्ष, नवी दिशा याची कास धरत आपलं मंडळ आणि मंडळाचे कार्यकर्ते नव्या उमेदीने २०१८ साठी सज्ज आहेत. या वर्षी आपल्या मंडळाने सभासदांसाठी 'Online Registration System' सुरु केली आहे. आता मंडळाची membership सहजपणे online घेता येऊ शकते. तसंच जे आपले सभासद नाहीत, पण मंडळाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहू इच्छितात, त्यांनाही त्यांची तिकिटं online घेता येऊ शकतील. आपल्या सभासदांना RSVP करताना शक्यतो कोणत्याही प्रकारे log-in करायचीसुद्धा गरज पडणार नाही, अशी सोय करायचा या system मध्ये प्रयत्न केलेला आहे. ज्या सर्वांनी यासाठी मदत केली, त्यांचे मनापासून आभार!!
जरासा विस्मृतीत गेलेला 'रसिका तुझ्याचसाठी' हा केवळ आपल्या सभासदांसाठीचा एक अनोखा उपक्रम देखील मंडळ या वर्षीपासून तुम्हा सर्वांसाठी परत घेऊन येत आहे . शिवजयंतीच्या निमित्ताने मार्च महिन्यात आपण त्याचा शुभारंभ करणार आहोत. त्याबद्दलची सविस्तर माहिती लवकरच आपणा सर्वांना ई-मेल आणि फेसबुकद्वारे कळवण्यात येईल. So stay tuned!!
मंडळाचा नवीन वर्षातील पहिला event, 'Volunteering Event' जो आपण Gleaners Food Bank येथे केला तो ही फार उत्तम पार पडला. मिशीगनच्या बोचऱ्या थंडीतही मंडळाचे ४० हून अधिक कार्यकर्ते यात सहभागी झाले होते. मला विशेष उल्लेख करावासा वाटतो तो आपल्या Youth Committee चा! मोठ्यांबरोबरच आपल्या Youth चा पण Event Organization, Coordination आणि Execution मध्ये मोलाचा वाटा होता.
आज आता आपला या नवीन वर्षातला पहिला Mega Event - 'संक्रांत २०१८'! संक्रांत जरी जानेवारी महिन्यात होऊन गेली असली, तरी आज आपल्या मित्रमंडळींबरोबर आपला हा सोहळा दणक्यात रंगणार आहे!! त्यानिमित्त आपल्यातल्याच तब्बल ७० पेक्षा जास्त कलाकारांनी मिळून बसवलेला 'यादों की बारात' हा संगीत-नृत्याचा, गतकाळातील आठवणींत रमवून टाकणारा कार्यक्रम आज आपल्यासाठी सादर होणार आहे. त्यानंतर जेवणात खास आपल्या महाराष्ट्रातून मागवलेली गुळाची पोळीही आहेच! अशा या सोहळ्याच्या गोड आठवणी आज तुम्ही इथून घेऊन जाणार, हे नक्की!!

नेहमीप्रमाणेच, तुम्हाला काही प्रश्न असतील, सूचना असतील तर त्या मला जरूर कळवा.

**आपली विश्वासू,**
**अनघा हुपरीकर**
**अध्यक्ष**
**महाराष्ट्र मंडळ, डेट्रॉईट २०१८**

## झोका आठवणींचा

आपली गाडी पुढे जात असली तरी मागच्या आरश्यातून मागे वळून आपण बघत राहतो. प्रेमाने निरोप देणारी आजी, आवडतं झाड, जिथे खूप मजा केली तो समुद्र किनारा, ४ दिवस खुशीत राहिलो ते हॉटेल.... हे दिसेनासं होईपर्यंत! त्या rearview mirror मध्ये पाहिलंत, तर तुम्हालाही दिसतील ७० ते ९० ही दशकं.




आज या देशातच नव्हे तर जगात काय चाललं आहे त्याची बीजं तेव्हा रोवली गेली... वॉटरगेट प्रकरण, म्युनिक ऑलिम्पिकचे हत्याकांड, व्हिएतनाम युद्ध, बर्लिनची भिंत फोडून दोन ध्रुव जवळ आले, ऍपल संगणकाचा जन्म.... अशा किती घटना की ज्यांचे पडसाद आजही उमटत आहेत. स्नेहबंधचे अनेक वाचक गेली चाळीसेक वर्ष इथे स्थायिक आहेत, 'स्टार वॉर्स' किंवा 'द गॉडफादर' च्या आठवणी त्यांच्या मनात अजूनही ताज्या आहेत.

आणि तुमची गाडी भारतातल्या रानागावांतून निघाली असेल तर मागे वळून पाहताना तुम्हाला दिसेल 'अमिताभ' नावाचा एक शहेनशहा, 'जितेंद्र अभिषेकी' हे मराठी रंगभूमीला पडलेलं सुंदर स्वप्न, 'आणीबाणी' नामक एक वणवा ज्यात देश होरपळला व अनेकांची मूल्य कसोटीला लागलं (म्हणूच की काय, या विषयावर एक निनावी लेख आला आहे!) ... आणि 'दूरदर्शन' ही निर्माण झालेली देशव्यापी सांस्कृतिक मिती! कदाचित देशभर सर्वजण तोच कार्यक्रम त्याच दूरदर्शनवर एकाच वेळी बघत आहेत हा सर्वांना सांधणारा दुवा असेल.

अर्थात् तुमच्या आमच्या सगळ्याच वाटा काही सारख्या नव्हत्या. कोणी वर्तमानपत्रांचं बदललेलं स्थान पाहून हळहळतं, तर कोणी संपर्काच्या माध्यमांत गुंतून जातं, कुणाला सांस्कृतिक चौकट न ओलांडणारा नाट्यचित्र क्षेत्रातला शृंगार खुणावत राहतो, तर कुणाला मार्ग चोखाळला नाही ही रुखरुख लागून राहते... म्हणूनच या आठवणी नाहीत, या आहेत 'मर्मबंधातल्या ठेवी'

या अंकाला भरभरून प्रतिसाद दिलात. पुढेही हा लोभ असाच ठेवावा ही विनंती.

**- स्नेहबंध संपादक मंडळी**

**संपादक**
*ज्योत्स्ना दिवाडकर*
*संजय मेहेंदळे*
*ऋतूज देशपांडे*
*सुशांत खोपकर*
*उमा कानडे*

**मुखपृष्ठ रचना व मांडणी**
*मानसी डहाणूकर*

लेखकांना, चित्रकारांना आणि *वाचकांना*
संपूर्ण मतस्वातंत्र्य देण्यात आले देण्यात आले आहे. *लेखांतून* व *चित्रांतून* व्यक्त झालेल्या मतांशी संपादक किंवा आपण सहमत असूच असे नाही, तेंव्हा आपण हा अंक केवळ "मनोरंजनासाठी" आहे अशी अपेक्षा ठेवून वाचावा, ही विनंती!

## जाने कहाँ गये वो दिन......

आमच्या वेळी चार आणे किलो गोडंतेल होतं..... शंभर रुपये तोळा सोनं होतं.... चारशे रुपयांत महिन्याचा घरखर्च, पै-पाहुणा, आलागेला सगळं भागायचं..... अशी आई-बाबांच्या पिढीची, काहीशी अशक्य वाटणारी, वाक्यं ऐकत मोठी झालेली आमची पिढी सुद्धा आता त्याच सुरात; पंचवीस पैशात वडापाव मिळायचा.... दीड रुपयात मॅटिनीच्या सिनेमाचं बाल्कनीचं तिकीट बसायचं..... दोघांच्या इडली-वडा सांबार, मसाला-डोसा, कॉफीचं बिल पाच रुपयांत सहज भागायचं..... अशी आता आपल्या मुलांचं सोडाच; पण स्वतःला सुद्धा अशक्य वाटणारी वाक्यं बोलायच्या दिवसांत आली आहे.

सत्तरीच्या दशकात, आधी हायस्कुलात आणि नंतर कॉलेजात असलेला मी...., म्हणजे आजच्या संदर्भात पंचेचाळीस-एक वर्षांपूर्वी..... इतकी वर्षं उलटून गेली यावर चटकन विश्वासच बसत नाही; काही काही गोष्टी अगदी कालपरवा घडल्यासारख्या वाटतात.... अगदी सहजासहजी आठवतात. ते दिवस अतिशयच बाळबोध आणि सोपे होते.... श्रीमंत, गरीब आणि मध्यमवर्गीय असे साधेसरळ तीन सामाजिक स्तर होते. 'उच्च मध्यमवर्गीय' हा प्रकार उदयाला यायचा होता....लोकं आपापल्या घरीच जेवूनखाऊन सुखी होती. उठल्यासुटल्या हॉटेलात जाणं; मनात येईल तेंव्हा चितळ्यांकडे जाऊन लाडू, चकली, चिवडा, शेव विकत घेणं; कोणी करत नसे. 'फराळाचे' पदार्थ लोकं घरीच करत.... आणि तेसुद्धा फक्त दिवाळीलाच!

बहात्तर सालचा 'दुष्काळ' आणि पंच्याहत्तर सालची 'आणीबाणी', ही दोन्ही 'अस्मानी' आणि 'सुलतानी' संकटं सोडली; तरी दिवस तसे फारसे सुखावह नक्कीच नव्हते.... लोकं आपली 'आहे त्यात समाधान' मानून आयुष्य कंठत होती. दुष्काळानंतर रेशनच्या लांबच लांब रांगा असायच्या.... रांगांची हीच सवय पुढे सर्वच गोष्टींना लागू झाली. घरी फोन हवाय, अर्ज करा आणि नंबर(रांग) लावा; घरी कुकिंग गॅस हवाय, अर्ज करा आणि रांग लावा; Vespa किंवा बजाज स्कुटर हवी आहे, अर्ज करा आणि रांग लावा;..... एवढंच कशाला चितळ्यांची 'बाकरवडी' हवीय, रांग लावा (नशीब; अर्ज नाही करायला लागायचा)



पण हळूहळू प्रगतीची चिन्हं दिसत होती..... १९७१ च्या युद्धात डाक्का आणि कराची दोन्ही आघाड्यांवर पाकिस्तानचा पूर्ण पाडाव, १९७४ साली अणुबॉंबची पहिली यशस्वी चाचणी, १९७५ साली आर्यभट्ट उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण; इत्यादी गोष्टींमुळे जगात भारताची मान आणि शान उंचावली होती. अजित वाडेकरच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट संघाने पहिल्यांदाच परदेशात कसोटी क्रिकेटची शृंखला जिंकण्याचा पराक्रम केला. आधी वेस्ट इंडिज आणि नंतर चक्क गोऱ्या साहेबाला त्याच्याच देशात, त्याच्याच खेळात धूळ चारली. 'वन डे' क्रिकेट नावाचं नवीनच खूळ सुरु झालं होतं. अतिशय संथ गतीने, पाच-पाच दिवस चालून, शेवटी 'ड्रॉ' होणाऱ्या कंटाळवाण्या कसोटी क्रिकेटच्या पार्श्वभूमीवर; एक दिवसात संपणारं, हमखास निकालाची खात्री देणारं हे रसायन अजून तितकसं लोकप्रिय झालं नव्हतं.....जणू एखाद्या चमत्काराची वाट पाहत होतं. एकच चॅनेल असलेलं, ठराविक वेळच चालू असणारं; दूरदर्शन हे माध्यम आता चांगलंच हातपाय पसरू लागलं होतं..... येणाऱ्या भविष्यकाळातील 'घरबसल्या करमणुकीची' ही नांदीच होती.

ऐंशी च्या दशकात मात्र सहजगत्या लक्षात येण्याजोगे आर्थिक आणि सामाजिक बदल वेगाने घडून येत होते. भारताने पहिल्यांदाच Asiad स्पर्धा भरवल्या होत्या. त्यावेळी पर्यटक आणि खेळाडू यांच्यासाठी म्हणून आणलेल्या २x२ लक्झरी बसेस; पुढे नंतर ST च्या ताफ्यात सामील केल्या गेल्या.... तोपर्यंत दूरगावी प्रवासास जाण्यास लाल-पिवळी यष्टी किंवा पाशिंजर गाड्याच असायच्या. आजच्यासारख्या Volvo चे अथवा Two Tier AC sleeper coaches नसायचे. याच Asiad स्पर्धांच्या निमित्ताने

चंचुप्रवेश केलेल्या रंगीत दूरचित्रवाणी संचांनी; "Neighbor’s envy; Owner’s Pride" ‘तत्व’ ग्राहकांच्या गळी उतरवत, कृष्णधवल दूरचित्रवाणी संचांना या दशकाअखेर पार मोडीत काढलं. आणि याच दशकात ‘तो’ चमत्कार घडला..... आत्तापर्यंतच्या दोन विश्वकरंडक स्पर्धांमध्ये अजिंक्य राहिलेल्या बलाढ्य वेस्ट इंडिज संघास; भारतीय संघाने कपिल देवच्या नेतृत्वाखाली 'वन डे वर्ल्ड कप' मधे मात दिली आणि प्रुडेन्शिअल चषक घरी आणला. त्या दिवसापासून क्रिकेटच्या खेळाची भारतातील लोकप्रियतेची कमान सतत चढतीच राहिली....हा खेळ; केवळ ‘खेळ’ न राहता काहींच्या साठी 'करिअर' बनला, जाहिरातदारांच्या साठी 'सोन्याची कोंबडी' बनून दूरदर्शनच्या बोकांडी बसला, सामान्य जनतेसाठी विरंगुळा म्हणून न उरता जीवनाचा अविभाज्य भाग बनला. आता 'उच्च मध्यमवर्गीय' हा नवीन वर्ग फोफावला होता.... लोकं आता हॉटेलमधे पोट भरायला 'गरज' म्हणून ना जाता; 'सहज' म्हणून जात होते.... 'बिल्डर' नावाचा एक नवीनच भस्मासुर उदयास आला होता...... पुण्या-मुंबईच्या आसपासची अनेक उपनगरं एखादी सूज वाढावी; तशा अचाट आणि अफाट वेगाने वाढत होती.



सत्तरीच्या 'अस्वस्थ दशकाच्या' घुसमटलेल्या जगात; "है कोई माईका लाल?" (नमकहराम) असा आवाज देत पुढे आलेल्या 'अँग्री यंग मॅन' डॉन, शहेनशहा चं एकछत्री साम्राज्य; ऐंशीच्या दशकाच्या सुरवातीस तसंच अबाधित होतं.... पण त्यालाही आता हादरे बसू लागले होते. लांब कल्ले, काना-मानेवर रुळणारी झुलपं, २३ इंची बेलबॉटम पँट्स, मोठाल्या कॉलरचे घट्ट शर्ट्स..... आणि त्यांची वरची बटणं उघडी, चार-चार बोटी रुंद पट्टे, भर उन्हाळ्यातसुद्धा अंगात घालायची जॅकेट्स....अशा सत्तरीच्या दशकांपासून चालत आलेल्या लोकप्रिय फॅशन्स आता कालबाह्य होत होत्या.... 'बीस साल पहले' घडलेली कहानी..... 'बीस लाख का सोना' आणि स्मगलर्स.... 'बचपनमे बिछडे हुए भाई'..... 'आरे वरळी' इथल्या बागेत झाडांभोवती नाचत-फिरत गाणी म्हणणारे थोराड नायक आणि नायिका..... या त्याच त्याच चक्रात फिरणारा हिंदी सिनेमा; आता कात टाकून, काहीतरी हटके, नवीन देऊ पाहात होता. आमिर खान, सलमान खान, शाहरुख खान अशी 'खानोंकी खान' आता हिंदी चित्रपटसृष्टीला सापडली होती. Yezdi, Bullet या एकेकाळी 'मर्दोन्की पहचान' असणाऱ्या मोटारसायकल्स मागे पडून; आता Yamaha-




Rajdoot, Hero-Honda, Ind-Suzuki, Bajaj-Kawasaki या नवीन स्टायलिश 'बाईक्स' वरून तरुणाई बुंगाट सुटली होती. 'सायकलींचे शहर' म्हणून ओळखले जाणारे पुणे आता 'मोटारसायकलींचे शहर' म्हणून ओळखले जाऊ लागले..... ग्रामोफोनच्या तबकड्या, स्पूल टेप्स यांना कॅसेट्सनी हद्दपार केलं होतं..... वॉकमन काही दिवस खूप प्रचलित होते.... पूर्वी दिवाणखान्याची शान असलेले मोठमोठाले रेडिओ जाऊन आता त्या जागी लहान 'ट्रांझिस्टर' आले होते. भाड्याने VCR आणून एका रात्रीत तीन-तीन सिनेमे बघायचे पराक्रम याच दिवसांत केले गेले.

नव्वदीच्या दशकात प्रगती(?)ची ही घोडदौड अधिकच जोमाने चालू राहिली. टीव्ही च्या सहाय्याला आता केबल आणि डिश आल्या होत्या.... ज्या टीव्ही वर 'फुल खिले हैं गुलशन गुलशन', 'प्रतिभा आणि प्रतिमा', 'सुरभी', 'बुनियाद' अशा अनेक दर्जेदार सीरिअल्स पहिल्या होत्या; त्या टीव्ही वर आता असंख्य चॅनेल्स आणि त्यांच्यावर लागणाऱ्या (बे)सुमार सीरिअल्सचा अहोरात्र रतीब सुरु झाला. डिशच्या (अव)कृपेने बे-वॉच सारख्या 'डोळ्याचं पारणं' फेडणाऱ्या सीरिअल्सदेखील रिमोटच्या इशाऱ्यासरशी दिवाणखान्यात हजर होऊ लागल्या. बाळबोध वळणाच्या, सांस्कृतिक मूल्य जपणाऱ्या, पिढीच्या संस्कृतीरक्षणाच्या जबाबदारीत; 'मुलांपासून रिमोट लपवून ठेवणे' याची भर पडली. भारतीय मुलींनी 'मिस युनिव्हर्स', 'मिस वर्ल्ड' स्पर्धा जिंकल्या होत्या..... आणि सौंदर्यप्रसाधनाची उत्पादनं बनवणाऱ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांना 'विकसनशील' देशाची एक भलीमोठी बाजारपेठ सापडली होती.... वेगवेगळ्या प्रदेशांचे, राज्यांचे हमखास वेगळी ओळख सांगणारे पेहराव आता मागे पडत चालले होते आणि जीन्स, टी-शर्ट्स अगदी पार खेड्यापाड्यापर्यंत दिसू लागले होते. सत्तरीच्या दशकात फियाट, ॲम्बॅसॅडर आणि जीप यांच्याशिवाय दुसऱ्या गाड्या क्वचितच पाहिलेल्या रस्त्यांनी; आता मारुती-सुझुकी ची वेगवेगळी मॉडेल्स सुळसुळत होती..... येणाऱ्या दशकांतल्या इंपोर्टेड टोयोटा, होंडा, ह्युंदाई गाड्यांची ही बहुधा चुणूक होती.... 'प्लास्टिक मनी' याने की 'क्रेडिट कार्ड' बाजारात येऊ लागली होती....नव्वदीच्या दशकाच्या उत्तरार्धात ATM च्या वापरास आणि सेल फोनच्या वापरास सुरवात झाली.... तेलाचे घाणे, दळणाचं जातं, पिठाची गिरण कधीच अस्तंगत झाली होती..... तयार मसाले, हळद, तिखट, तेल, कणिक यांची पाकिटं दुकानांमधून हमेशा उपलब्ध झाली होती..... 'यह ही है राइट चॉइस, बेबी, आsहाss!' म्हणत Pepsi आणि Coke आता भारतीय बाजारपेठेत स्थिरावले होते. इंटरनेट चा वापर सुरु झाला होता. Y2K च्या बोलबाल्यानंतर सॉफ्टवेअर ऑफ-

शोअरिंग मोठ्या प्रमाणावर सुरु झालं होतं आणि आता तर H1B व्हिसाने अमेरिकेत नोकऱ्यांची संधी सुद्धा चालून आली होती. Thomas L. Friedman च्या 'The World Is Flat' पुस्तकाप्रमाणे सारं जग सपाट एकजिनसी व्हायला सुरवात झाली होती.

- **संजय मेहेंदळे**

## असा कधीही यावा

असा कधीही यावा तो क्षण
जुनी पुराणी, पुसली आठवण
कवडस्यापरी, मनात माझ्या
क्षणापुरती का, चमकून जावी

असा कधीही यावा तो क्षण
वाहता वाहता, झुळूक एक ती
थबकून हलके, कानी माझ्या
जुनी सुरावट, आळवून जावी

असा कधीही यावा तो क्षण
डोळ्यापुढती चित्र देखणे
उभे राहावे जुने कशाचे
स्वप्नी अथवा जागेपणीही

असा कधीही यावा तो क्षण
सहज चालता वाटेवरूनी
पाठमोर वा, सावलीतुनी
भेट आपसूक, जुनी घडावी

असा कधीही यावा तो क्षण
वेळ जरासा, जावा थबकून
आणि पाऊले, घेत मागुती
सैर घडावी, गतकाळाची

- **सुरेश नायर**

## मी आयुष्यात एकदा (च) मोर्चात भाग घेतला होता..

खरं सांगायचं तर आमच्या कॉलेजच्या लेडिज हॉस्टेलला नावं ठेवण्यासारखं काहीच नव्हतं- फक्त भंकस जेवणाबद्दल प्रसिद्ध असलेली मेस (खाणावळ) सोडून.

एकदोन वर्षांपूर्वीच बांधलेली एकमजली, टुमदार इमारत. भोवती दाट झाडी आणि उंच कुंपण. त्यावर सुंदर बोगन (शोभन)वेली. खूप सारे बुचाच्या फुलांचे उंच वृक्ष--- त्यांना आम्ही बुच म्हणून अपमान न करता नभजाई, आकाशमोगरी, फुलझुंबरी असं कायकाय कौतुकानं म्हणत होतो. मोठ्या दरवाज्यातून आत आल्याबरोबर डावीकडे सरस्वतीची मोठी, छानशी मूर्ती होती, आजूबाजूला बसायला आरामशीर सोफे होते, मधल्या चौकात वाळू टाकून मस्त अंगण केलं होतं. इतक्या सुंदर वास्तूमधे अभ्यास करायचा कंटाळा आलाच तर जवळच टेकडी, तिच्यावरून सूर्योदय आणि सूर्यास्त भान हरपून बघण्याची सोय होती. अजून धाडस करून वेताळटेकडीवर गेलंच तर तिथे मोरसुद्धा दिसायचे. फक्त मेसमधलं जेवण सोडल्यास कॉलेजजीवन अगदी मोरपंखी होतं--------

पण या जवळजवळ परिपूर्ण जीवनात एक वादळ उठलं-- चहाच्या कपातलं म्हणा हवंतर--पण वादळच.



एका रविवारची दुपार.  आज फीस्ट-- म्हणजे जेवायला काहीतरी खास बेत. तो रविवार तसा रिकामाच होता- म्हणजे कुठलीतरी मोठी परीक्षा नुकतीच होऊन गेली होती पण निकाल अजून समजायचा होता. गॅदरिंग वगैरे नुकतंच होऊन गेलं होतं. उत्साहाने जाऊन बघावा असा सिनेमाही जवळपास कुठे लागला नव्हता. काहीजणींची जेवणं झाली होती, काहींची रमतगमत सुरू होती. आनंद सिनेमात राजेश खन्नाचा अभिनय वरचढ की अमिताभ बच्चनच जास्त भाव खाऊन गेलाय यावर अटीतटीची चर्चा सुरू होती---मेशीतल्या काम करणाऱ्या बायका घरी जाण्यासाठी ताटकळल्या होत्या--- आळसावलेली दुपार समोर आ वासून पसरली होती----

इतक्यात---

" ई----ई----ई---यॉक्---बॉक्----ऑक्---"

अशी भीषण किंकाळी अन् पाठोपाठ उलट्यांच्या आवाजांनी सगळ्या मेसला हादरवून टाकले. या किंकाळ्यांचे उगमस्थान होते सगळ्या होस्टेलला धाकात ठेवणारी सिनियर- रूबी रूस्तुम! उंचनिंच, धिप्पाड आणि प्रचंड आवाजाची रूबी आपल्या ताटातल्या वाटीकडे बोट दाखवत होती, थयथय नाचत होती, तोंडाने किंचाळणे अन् उलट्या दाबणे या क्रिया जमेल तशा करत होती.

बघता- बघता तिच्याभोवती ही---- गर्दी झाली.  ती जे दाखवत होती ते बघून आणखी दहाजणी किंचाळत, उलट्या दाबत, नाचायला लागल्या--- कारण रूबीच्या ताटात आमटीच्या वाटीत एक मध्मम आकाराचे मेलेले झुरळ तरंगत होते!

आता हेच झुरळ जर मंजू कानडेला सापडले असते तर तिने शांतपणे ती वाटी महाराजांना म्हणजे मेशीच्या स्वयंपाक्याला दाखवून त्यांच्याकडून पुन्हा असा हलगर्जीपणा होणार नाही अशी कबुली घेतली असती अन् झुरळासकट ती आमटी कोणाला न दाखवता फेकून दिली असती. नलू सोनावणेने झुरळ काढून टाकून काहीच न झाल्यासारखे जेवण चालू ठेवले असते. ज्योती ओगलेने आमटीत उकळलेल्या झुरळाचे डिसेक्शन करण्याचा प्रयत्न केला असता. काहीजणींनी मेसच्या मॅनेजरला (तिथे कधीच नसलेल्या) भरपूर शिव्या घातल्या असत्या---

पण रूबी? नेमके हे दुर्दैवी झुरळ रूबीच्या वाटीतच आले अन् पुढचे सारे रामायण- महाभारत घडून आले.

आता पुढे काय?

आम्ही पहिल्या वर्षाच्या लिंबूटिंबू पोरी रूबीकडेच आदराने आणि अपेक्षेने बघू लागलो. त्यामुळे की काय - रूबी अगदी पेटून उठली!

"ये कैसे हमको बकवास खिलाता है --- इतना पैसा लेता है --- मै तो यहां नहीं खानेवाली---- कुछ तो करना होगा ---"

या शेवटच्या विधानावर एकदम एकमत झाले.

लेडीज होस्टेलची जबाबदारी खरं तर होती प्राचार्य सरवटेंवर. जवळच्याच त्यांच्या बंगल्यात ते व सौ. सरवटे गुण्यागोविंदाने राहात असत. "तुम्ही मला त्रास देऊ नका, मीही तुम्हाला त्रास देणार नाही"-- हा त्यांचा खाक्या होता. त्यातून ते संस्कृतचे प्रकांड पंडित असल्यामुळे सध्याच्या काळातल्या मुलीबाळींकडे त्यांचे अजिबातच लक्ष नसे.

" प्रिन्सिपॉलजीको दिखायेंगे ये दाल! तुम सबको आना होगा मेरे साथ--- तुम सबने येहीच दाल खायी है----" याही रूबीच्या धमकीवजा मागणीवर एकमत झाले.

"असंच ताट घेऊन चल-- सरांना बघू दे आपल्या पोरी काय खाताहेत!"

"ए आपण अगदी झक्कास मोर्चाच नेऊया सरांच्या घरावर"

"चला, चला, सगळ्यांना गोळा करा पटापटा"

"अय्या, पण मोर्चा म्हणजे घोषणा हव्याच"

"आणि झेंडे हवेच"

"जरा ताशे, वाजंत्री, बँड असेल तर मोर्चा उठावदार होईल नै?"

मग सगळ्या भराभरा कामाला लागल्या. रूबीने होस्टेलच्या एकूणएक मुलींनी मोर्चात भाग घेतलाच पाहिजे असा फतवा काढला. दोघीजणींना तशी दवंडी पिटायलाच तिने भाग पाडले. ज्योतीकडे घोषणा तयार करण्याचे आणि माझ्याकडे झटपट झेंडे तयार करण्याचे काम ढकलण्यात आले. मी आनंदाने ती जबाबदारी स्वीकारली. चार पोस्टरबोर्ड घेऊन त्यांवर मोठमोठी भेदक झुरळे काढून मी मेशीतल्याच झाडूच्या काड्यांना ते अडकवले. घोषणांचे कागद वाटण्यात आले. ताटल्या, पराती, झारे, लाटणी, गनिमी काव्याने ताब्यात आले. एकदोनदा प्रॅक्टिस करण्यात आली.

राखणदार किसनभाऊची नुकतीच लग्न झालेली धिटुकली बायको काय चाललंय बघायला आली.

"सगल्या तायाबाया लय पेटल्यात जनू" -- म्हणत तिनेही बरोबरीच्या साळकाया -माळकाया बोलावून आणल्या.

"आमी बी येतो की मोर्चात - नायतर कवा चांस मिलनार?"

मागे राहणाऱ्या गड्यांची पोरं क्रिकेट सोडून पळत आली.

"आमाला पन झेंडे पायजेल मोर्चात नाचवायला---"

असो. तयारी तर जय्यत झाली! पण एक अडचण होती - होस्टेल आणि प्राचार्यांचे घर अगदीच एकमेकांजवळ होते. एवढ्यात मोर्चात जोश कसा भरणार? मग आधी सगळ्या कॉलेजमधे मोर्चा फिरवून मग शेवटी सरांकडे जायचे असा ठराव पास झाला.

रविवार होता तरी कॉलेजात तुरळक गर्दी होतीच. खेळाच्या मैदानाच्या आसपास बरीच निरुद्योगी पोरं रेंगाळत होती. हा मोर्चा बघून एखाद्या लोहचुंबकाने लोखंड आकर्षुन घ्यावे तशी ती धावत आली व त्यामागचे गंभीर कारण समजल्यावर बहुसंख्येने सामील झाली. त्यांच्याही मेसीत असेच भयानक प्रसंग येऊन गेले होते म्हणे!



"नाही खाणार, नाही खाणार
झुरळाची आमटी नाही खाणार "
"एक दोन तीन चार
झुरळाची आमटी भंकस फार"
" वन टू थ्री फोर
कॉकरोच दाल नो मोअर"

"कॉकरोच फॉर डिसेक्शन
नॉट फॉर कंझप्शन"

अशा जहाल घोषणा सुरू झाल्या. हिंदी घोषणांनी मोर्चा अजून क्रांतिकारक होईल असे सर्वांना वाटत होते, झुरळाला हिंदीत काय शब्द आहे ते कोणालाच माहीत नव्हते, त्यामुळे काही रोमांचकारी घोषणा नाईलाजाने रद्द करण्यात आल्या होत्या.

सर्वात पुढे हातात ताट घेऊन रूबी. वाटीतल्या आमटीमधले झुरळ सांभाळत, ती जोशात चालत होती. आपण शूरवीर झाशीची राणी आहोत की झुरळाची आमटी खाल्लेली हीनदीन हुतात्मीण आहोत याबद्दल तिचा निर्णय होत नव्हता. शेवटी तिने स्वतःच्या स्वभावाला साजेशी झाशीच्या राणीची भूमिका नक्की केली.

रूबीच्या मागे झेंडे नाचवत आम्ही पहिल्या वर्षाच्या पोरी. मागे "काय मज्जा होतेय् ते तर बघुया" म्हणत आलेल्या होस्टेलच्या इतर पन्नास-साठ मुली, रखवालदारांच्या बायका, त्यांच्या मैत्रिणी, ताट चमच्यांच्या वाजंत्र्या वाजवणारी बारकी पोरं, तात्विक पाठिंबा दर्शवायला आलेले बरेच वर्गबंधू असा भव्य मोर्चा प्राचार्य सरवटेंच्या बंगल्याच्या आवारात शिरला. सरांच्या दारावर जेव्हा दणदणीत थापा पडल्या तेव्हा विविध कर्णकर्कश आवाज, घोषणा, कलकलाट यांची परिसीमाच झाली होती!

दुपारची झोप मोडल्यामुळे थोड्याशा वैतागलेल्या सौ. सरवटेंनी दार उघडले अन् त्यांच्या डोळ्यांवरची झोप खाडकन् उडाली!

"क्--काय झालं? निवडणूक वगैरे तर नाही ना? अहो --- उठा आणि जरा बाहेर या बघू!"

प्राचार्य सरवटे बाहेर आले आणि सर्व भीषण आवाज क्षणभर थांबले.

रूबीने शांतपणे आपले ताट मध्यभागी असलेल्या "त्या" वाटीसकट श्री व सौ. प्राचार्यांपुढे धरले. आधीच गोंधळलेले ते दोघं आणखीनच बावरून गेले. रूबी व मोर्चातील बिनीच्या स्वारांनी एकदम आपली कैफियत जोरजोरात मांडायला सुरुवात केली. पाठोपाठ घोषणाही सुरू झाल्या---

" ठहरो---" रूबीचा बुलंद आवाज घुमला--- "आज मेसमें हमारी दालमें ये कॉकरोच, यानेकी झुरल हमको मिल्या-- ऐसा खाना खिलाते हैं हमको"

ताबडतोब-- "नही खायेंगे, नही खायेंगे"---सुरूच झालं.

प्राचार्य सरवटेंनी हताशपणे सौ सरवटेंकडे पाहिलं. त्या नजरेमधील संपूर्ण शरणागती पाहून सरवटेबाईंनी परिस्थितीवर स्वतःची राजवट प्रस्थापित केली. सरांच्याही पुढे येऊन त्या आत्मविश्वासाने उभ्या राहिल्या अन् रूबीपेक्षाही खणखणीत आवाजात म्हणाल्या--

" एकेकीनं बोला ग---म्हणजे आम्हाला काहीतरी कळेल. कुठून आलं हे झुरळ?"

" ये मेसमें हमारी दालमें स्विमिंग कर रहा था" संतापाने आता रूबीच्या तोंडाला फेसच यायचा राहिला होता. तिच्याकडे, झुरळाकडे, मोर्चाकडे बघून सरवटेबाईंना प्रसंगाचं गांभीर्य लगेचच लक्षात आलं. प्राचार्य आपल्या अभ्यासिकेत अंतर्धान पावले.

सौ. सरवटेंनी मायेने एक हात रूबीच्या केसांवर आणि दुसरा तिच्या खांद्यावर ठेवला.

" ही काय मेस आहे का सोंग? घरापासून दूर राहिलेल्या पोरीबाळींना झुरळं खायला घालतात मेले! आधीच अभ्यासाचं टेन्शन---सत्राशेसाठ परीक्षा--- घरची आठवण--- कशा ग बाळांनो सहन करता हे सगळं?"

टाचणी लावून फुगा फोडावा तशी घरच्या उल्लेखाने रूबीमधली तापलेली हवा फटकन् बाहेर पडली अन् तिचे डोळे भरून आले. 'फॉलो द लीडर' खेळाप्रमाणे आघाडीवरील खंद्या कार्यकर्त्यांच्याही डोळ्यांमधून अश्रूधारा सुरू झाल्या. घोषणा अर्थातच बंद पडल्या.



पायात चपला अडकवत आणि पदर खोचत सरवटेबाई म्हणाल्या--

"चला ग बाळांनो--आपण सगळ्याजणी जाऊन त्या मेशीच्या मॅनेजराला अन् म्हाराजाला जाब विचारू आणि त्यांनाच ही आमटी प्यायला लावू"

आता मोर्चाचा मूड एकदम पालटला व दिशा एकशेऐंशी कोनात वळली. मुसमुसणाऱ्या रूबीच्या हातातून ताटवाटी काढून घेऊन सरवटेबाईंनी मानाचे स्थान स्वतःकडे ओढून घेतले. दीडदोन मिनिटातच मोर्चा पुन्हा मेशीच्या दारात आला----

अन् दाराला लावलेले भलेमोठ्ठे कुलुप सर्वांच्या स्वागताला तयार होते. ते बघून मोर्चामधली उरलीसुरलीही हवा पा--र निघून गेली.

"आता ही वाटी मी माझ्याकडेच ठेवते. उद्याच चांगली फैलावर घेते सगळ्या गाढवांना. कोणाकोणाचं जेवण राहिलंय ग बाळांनो--चला आमच्याकडे लाडूचिवडा खायला. आणि हे बघ सोने, रडू नको माझ्या बाई--"

"नही, नही जी" रूबी डोळे पुसत म्हणाली.

"अगं बोलावताहेत तर जाऊ या की!" मी तिला कोपराने ढोसत हळूच म्हणाले. पण सरवटेबाई ती ऐतिहासिक वाटी घेऊन आपल्या बंगल्यात चपळाईने नाहीशा झाल्या.

अशा रीतीने डोळे पुसत, मुसमुसत, माझ्या आयुष्यातला पहिला आणि शेवटचा मोर्चा विसर्जित झाला.

- **वीणा शाह**

## असा(ही) एक सिलसिला



आर्मी, नेव्ही, एअरफोर्स मध्ये असणाऱ्या लोकांची पर्सनॅलिटी काही वेगळीच असते. मी कॉलेज मध्ये असतांना तर हे लोक जास्तच आवडायचे. म्हणजे गाणारा किंवा NDA चा मुलगा दिसला की कोवळ्या मनात तारे लुकलुकायचे. हे NDA मुलांच वेड मात्र लवकरच गेलं. याला जबाबदार माझे एक काका. एकदम हँडसम आणि करारी. प्रेमळ पण भयंकर रागीट. अनेक युद्धात सहभागी झालेले. अनेकदा मृत्यूला मिठी मारून परत फिरलेले हे काका. कदाचित त्यामुळेच ते असे रागीट झाले असतील. त्यांचं बोलणं हे बऱ्याचदा एखाद्या दणदणीत शिवीने सुरु व्हायच.

एका रविवारी कोवळ्या मनाचे आम्ही अगदी मन लावून अमिताभ-रेखाचा "सिलसिला" पिक्चर बघत होतो. अहाहा... अमिताभचा तो दणदणीत आवाज आणि रेखाचं लोभस सौंदर्य.. आमच्या तरुण मुलींचे विस्फारलेले डोळे, चेहेऱ्यावर तेच कोवळ्या मनाचं भुललेलं बावळट स्मित हास्य... "मैं और मेरी तन्हाई अक्सर ये बाते करते है..... ये कहाँsss आ गये हम.... असं वाटत होतं की आपल्याच मनातला हिरो आपल्याला म्हणतोय.... असं स्वप्नात असतांनाच अचानक एक करारी आवाज आला.. "भे... साल्यांना बॉर्डर वर पाठवा एकदा, सगळ्या तन्हाया कुठल्या कुठे पळतील...!!" आम्ही मुलींनीं रागाने त्यांच्याकडे बघितलं.... "जा हो काका तुम्ही. तुम्हाला नसेल बघायचं तर नका बघू ना ..." .... अर्थात हे असं मनात म्हटलं ..तोंडावर म्हणायची कोणाची हिम्मत होती! हे सगळं होईपर्यंत तर त्या गाण्यात अमिताभ "हवा का झोंका हैं या तुम्हारे बदन की खुशबु , ये पत्तियोंकी है सरसराहट..... जबकी मुझकोभी ये खबर है की तुम नहीं हो, कँही नहीं हो... " ... रेखाचे लांब सुंदर केस हवेने हलकेच तिच्या चेहेऱ्याला स्पर्श करून उडतात आहेत.. अमिताभ एक स्मार्ट स्वेटर घालून हे म्हणतो आहे ....आणि आssले ... काका हसत हसत परत तिथे आले.. "हराम... तेवढं पण कळत नाही की हे असं भूतच करू शकतं...!"

तिथेच आम्ही नाराजीने तो सिनेमा बंद केला आणि मनात शप्पत घेतली - NDA मुलं लांबूनच बघायला बरी..!

## रंग संक्रांतीचे

'संक्रांत हळदीकुंकू'च बोलावणं आलं की आधी टेन्शन येतं ...बापरे साडी नेसायची .... Yes, it is the most elegant outfit, no doubt....अरेsss पण त्या elegancy साठी जीवाचा किती आटापिटा करायचा?!.... मनुष्य एकाच साईझचा कायम राहील (नाही, म्हणजे असतात दुर्लभ) हे धरून सगळं शिवलेलं असतं. मग सुरु होते कसरत .... त्यात शिवणकामाची बोंबाबोंब! बरं संक्रांत म्हणजे काळी साडी... दर वर्षी कुठून नवीन आणायची?! ... तीच साडी?? ..काहीही हाsss .. मग कुठे ऍडजस्ट करायचंच तर चला काळ्या रंगाचा नाद सोडा. पण या वर्षी बहिणीची काळी साडी पळवली होती. आणि तिच्या ते लक्षात येताच. खणखणीत टेक्स्ट आला .. " ताई तू माझी साडी चक्क नेलीस ..मला न सांगता ????? पुढच्या ट्रिप मध्ये चुपचाप परत आण . नाही तर मी आल्यावर बघ कायकाय पळवते..!" .... चक्क धमकी ... म्हणजे ही साडी नेसायचा हा शेवटचा चान्स ... . तयार झाले आणि आधी तिला चिडवण्यासाठी एक फोटो पाठवला .... आणि हो, मी साडी नेसणार म्हटल्यावर मुलं आणि किशोर आधी वरच्या मजल्यावर पळाले.... असा फोटो काढ तसा काढ.. चांगला नाही आला ... कोण झंझट करेल.. मी कसली सोडते!
मी तयार झाल्यावर किशोरला हाक मारली . त्याने वरूनच खाली बघत "अरे वा , छान दिसते आहे (हे म्हणण्या पलिकडे चॉईस नाही.) कितीला येणार परत "
मी: अरे एक मिनिट खाली ये ना.. एक फोटो काढ ना.
किशोर: अगं फुटबॉल गेम चाललाय. वरूनच काढला तर चालेल का???
मी: .....
किशोर: आकाश, मिहीर मम्मी बोलावतेय खाली..
दोघे मुलं: मी फोनवर आहे. ..मी आभ्यास करतोय
किशोर परत एकदा खाली माझ्या चेहेऱ्याकडे बघत .. "अरे बघा जरा मम्मी कडे. किती छान दिसते आहे." दोन्ही मुलांना वडिलांच्या दयनीय परिस्थितीची त्याच्या आवाजातून जाणीव होते. दोघे येतात. एकदा माझ्या पडलेल्या चेहेऱ्याकडे आणि एकदा वडिलांच्या

चेहेऱ्याकडे बघतात आणि शेवटी तिघे खाली येतात. ८-१० फोटो निघतात एकदाचे. परत एकदा 'मस्त दिसते आहेस' असं किशोर म्हणतो. यावेळेस मुलं पण त्याला साथ देतात. मी निघते आणि घराबाहेरून पण त्यांना हुश्श झाल्याचे भाव मला जाणवतात.

पोहोचले एकदाची संक्रांत हळदीकुंकवासाठी मैत्रिणीकडे .... नवीन काळ्या साड्या विकत घेतलेल्या मैत्रिणी काळ्या साड्यात मिरवत होत्या पण जास्त जणींनी दुसऱ्या वेगवेगळ्या रंगाच्या साड्या नेसल्या होत्या.
इकडून तिकडून कोणी ना कोणी फोटो काढतच होत्या.



मध्येच एका मैत्रिणीला आठवण येते... अरे ग्रुप फोटो झालाच नाही! ... चला चला या सगळे. पटापट सगळ्या एका रांगेत उभ्या राहतात. एक फोटोग्राफी मध्ये जास्त इंटरेस्ट असलेली मैत्रिण एकदम त्या रांगेतून बाहेर येऊन म्हणते "सारखे रंग जवळजवळ नको हं" ... मग कसं???? .. असं करू आपण ता ना पी हि नी पा जा असे उभे राहु ..... अँ ???? ..अगं इंद्रधनुष्याचे रंग . काय हे पुणेकर ना तु ...आता यात पुणेकर आणि मुंबईकर किंवा कोणत्याही कराचा काय संबंध...! पण सगळे मजेच्या मूड मध्ये असतात. त्यामुळे १०-१५ मिनिट या "कर" प्रकरणांवर चर्चा, जोक्स होतात ... काळ्या साड्या घातलेल्या २-३ जणी असतात . त्यांना या ता ना पी हि रांगेत कुठे जावं कळत नाही.. मग आम्ही ता ना नंतर "का ' लावून मोकळ्या होतो. .... सगळं ठरल्यावर रांगेत उभं राहिल्यावर लक्षात येतं ...फोटो कोण काढणार ???? ....जिच्याकडे हळदीकुंकू असतं तिचा नवरा घाबरून आधीच फरार झालेला असतो. तिची १७-१८ वर्षांची मुलगी पकडली जाते. मैत्रीण तिला बोलावते. ती बिचारी येते. एवढी मोठी रांग आणि ह्या वाढत्या मावश्या ह्या कॅमेऱ्यात कश्या फिट होतील हा तिचा प्रयत्न चालू असतो. शेवटी तिला सोफ्यावर उभं राहावं लागत ... क्लिक ... एक फोटो निघाला ... ती पटकन तो फोन आईकडे देऊन तिथून निसटण्याचा प्रयत्न करणार तेवढ्यात बाकी मावश्यांची टॅव टॅव सुरु होते... ए माझ्या फोनने पण एक फोटो घे.. माझ्या पण..माझ्या पण... ती परत सोफ्यावर उभी राहाते.. आता तिचा पेशन्स जायला लागतो. आईच्या ते लक्षात येतं ..मग आई म्हणते "अगं सगळ्यांनी सगळ्यांना व्हाट्स अँप वर फोटो पाठवा ना ..." मग सगळे थोडं शांत होतात.
आता जी ह्या फोटो प्रकरणाने वैतागलेली असते (एखादिच) ती म्हणते, "आता सगळ्यांनी आपापले फोन पर्स मध्ये ठेवा बरं! आपण गप्पा मारल्याच नाहीत काही..." . मग गप्पा , खाणे-पिणे वगैरे ...आता सगळ्या थकलेल्या असतात ..घरची आठवण येऊ लागते . मन गप्पांनी, हसण्याने तृप्त आणि हलकं झालेल असतं ....
मी घरी पोहोचते. आता हे फोटो ग्रुप मध्ये पाठवायची घाई झालेली असते ...
हे संक्रांतीचे हळदीकुंकू बहुतेक बायकांच्या मौज-मजेसाठीच सुरु झालं असणार..

**- पल्लवी सप्रे**


The Future of Coatings
Dhake Industries
GLOBAL SUPPLIER OF COATINGS FOR PLASTICS AND METALS
Dhake Industries offers a wide range of products for Interior and Exterior Automotive Applications as well as other Non-Automotive Applications. Our products are custom formulated to meet the most stringent requirements of any market
• Known in the Industry for Unsurpassed Technical Capabilities
• Leader in Metallic Paint Development for Auto Interiors
• Rapid Product Development with Custom Formulations to Meet Market and Customer Specific Requirements
Various Paint Technologies
• 2K Monocoat
• 2K Base/Clear
• 1K Waterbase
• 2K Waterbase
• One-Coat over TPO/PP
• Adhesion Promoters
• Laser-Etchable Coatings
• Soft-Touch Coatings
• Chrome-Look Coatings
• In-Mold Coatings
• Hydrographics Clearcoats
• Metallic Coating Finishes
• Non-Metallic Coating Finishes
• Much Much More…
Dhake Industries
Please contact us for more information
Global Headquarters
15169 Northville Rd.
Plymouth, MI 48170
734-420-0101
www.dhakeindustries.com

## मिले सूर हमारा तुम्हारा..... !

नव्या-जुन्या मित्र-मैत्रिणींच्या गाठीभेटी घेत, नववर्षाची सुरुवात एकदम छान, दणक्यात झाली! जुन्या गप्पा रंगल्या आणि हलकेच जाणीव झाली कि कालपरत्वे हे आठवणींचं गोंडस गाठोडं, मस्तपैकी लठ्ठ होतंय... यातल्या काही हृदयस्पर्शी आठवणींनी, कधी नकळत डोळ्यांच्या कडा ओलावल्या, तर काहींनी खदखदून पोट दुखेपर्यंत हसवलं. असो.

गेल्या काही वर्षात अमेरिकेच्या दौऱ्यावर आलेल्या नाट्य, कला-संगीत क्षेत्रातील काही गुणवंत कलाकारांना जवळून भेटण्याचा, त्यांच्याशी मनमुराद गप्पा मारण्याचा सुयोग आला. अर्थात ऍन आर्बर मराठी मंडळ ( A२mm) आणि महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट (MMD) चा यात सिंहाचा वाटा आहे. यातले काही कलाकार नवोदित तर काही दिग्गज - पण आपापल्या क्षेत्रांत "विशेष " उल्लेखनीय कामगिरी बजावून पारंगत. कोणाच्या भाळी साक्षात सरस्वतीचा वरदहस्त, तर काहींच्या पाठीशी रंग-शारदेचा शुभाशीष! या सगळ्या गुणी कलाकारांशी मारलेल्या मनसोक्त गप्पा, एक वेगळाच आनंद देऊन, मनात कायमचं घर करून गेल्या.

आता, तसं बघितलं तर, प्रत्येक अभिजात कलाकाराच्या आयुष्यातला अविभाज्य घटक म्हणजे, त्याच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळातील धडपड, व्यावसायिक क्षेत्रात पदार्पण करून आपलं असं स्थान, आपलं अस्तित्व, आपली स्वतःची अशी एक ओळख या चुरशीच्या स्पर्धेत टिकवून ठेवणं... मग यश-अपयश, लोकप्रियता, प्रसिद्धी-पैसा ह्या सगळ्या गोष्टी तर ओघाओघाने येतातच, असं म्हणायला काही हरकत नाही. या कलाकार मंडळींचे कला-नाट्य प्रवासाचे अनुभव कधी सुखद, तर कधी खड्तर! यातील काही मंडळींना संगीत-नाट्य कलेचा पिढीजात वारसा लाभलेला तर कोणाला खालावलेल्या कौटुंबिक परिस्थितीमुळे उदरनिर्वाहासाठी ही क्षेत्रे स्वीकारावी लागलेली..

काही मंडळींचे अनुभव ऐकताना अक्षरशः अंगावर शहारे आले. अगदी प्रयोग सुरु ह्यायच्या किंचित आधी किंवा थेट प्रयोग चालू असताना येऊन थडकलेल्या आपल्या स्वतःच्या किंवा सह-कलाकारांच्या आप्त-स्वकीयांच्या, अगदी जवळच्या नातेवाईकांच्या अकाली निधनाच्या बातम्या, अचानकपणे तब्येत बिघडल्याने इस्पितळात दाखल केल्याचे त्यांच्या अनुपस्थितीतले हृदयद्रावक किस्से, त्यात भरीसभर म्हणजे म्हणजे आर्थिक चणचण, तेव्हाची त्यांची मेंदूला झिणझिण्या आणणारी, हतबल मनःस्थिती, त्यांच्या स्वतःच्या तोंडून ऐकताना, मन पार हेलावलं. पण शेवटी भावनेपेक्षा कर्तव्यच श्रेष्ठ मानणारी, आपल्या व्यवसायाशी इमान राखून - " याला जीवन ऐसे नाव " म्हणत हसत-खेळत आल्या प्रसंगाला समोर जाणारी ही, आम्हा दोघांना आपलं मानणारी, अगदी कोणताही आडपडदा न करता, आमच्याही दिलखुलास गप्पा मारणारी, आमच्या मनांत कायम बसलेली, काही सच्ची कलाप्रेमी मंडळी.



आज हा लेख लिहायला घेतला आणि मन सहज दहा-पंधरा वर्षे भुर्रकन मागे वळलं. -आणि पुन्हा एकदा पदमश्री श्री. सुरेशजी तळवलकरांचा तबला नव्याने कानात घुमला. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचा आत्मा असलेल्या, "गुरु-शिष्य" परंपरेबद्दलची त्यांची आत्मीयता, प्रभावशाली विचारप्रणालीस नतमस्तक होऊन, आमचे हात आपोआपच जोडले गेले. या तालयोगी पुरुषास आमचा मनाचा मुजरा! श्री. आनंद भाटे (आनंद गंधर्व) , श्री. संजय करंदीकर (तालवाद्य - तबला, ढोलकी , ढोलक व दिमडी ) आणि श्री. राजीव परांजपे (हार्मोनियम, ऑर्गन ), या त्रयींशी मारलेल्या, उधाण आलेल्या गप्पांना पुन्हा एकदा नव्याने उजाळा मिळाला. "विच्छा माझी पुरी करा" आणि विजयश्री निर्मित "खुमखूमी " फेम श्री. विजय कदम(अप्पांच्या ) बरोबर आमच्या जुन्या घरी, भरलं पापलेट आणि मालवणी पद्धतीचं झणझणीत कोलंबीचं कालवण भुरकून खाल्लेली, शब्दा-शब्दाला हास्यविनोदात आकंठ बुडलेली संध्याकाळ आठवली. अलीकडे " फु बाई फु " ची टीम - सौ. सुप्रिया पाठारे, श्री. अतुल तोडणकर आणि श्री. दिगंबर नाईक यांना भेटण्याचा योग जुळून आला. त्यांच्याशी मारलेल्या खुसखुशीत गप्पा आणि मजा मस्करीत, हसत खेळत घालविलेले क्षण आठवले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पसरलेलं आणि मराठी माणसांच्या मनामनांत रुजलेलं नाट्यसंगीत आणि विशेषतः आजच्या तरुण पिढीत शास्त्रीय संगीत लोकप्रिय करण्यासाठी योगदान देणारे युवा-कलाकार श्री. राहुल देशपांडे आणि प्रसिद्ध तबला वादक -श्री. निखिल फाटक या जोडगोळीबरोबर हसतखेळत, मजामस्करी करत दिलखुलास गप्पांच्या ओघात सहज, संध्याकाळ कधी सरली, याचं आम्हाला भानच राहिलं नाही.

अविरत प्रयत्न आणि कठोर परिश्रमांची कास धरून, संगीत-कला-नाट्य क्षेत्राला वाहून घेतलेली ही सगळी मंडळी, आज प्रसिद्धीच्या शिखरावर आहेत. त्यांची कलासाधना, व्यासंग, अपार परिश्रम ह्या सगळ्याला तोड नाही, किंवा मी तर असं म्हणेन की या क्षणी ते वर्णायला माझे शब्द अपुरे पडत आहेत. मंडळांच्या कार्यक्रमानिमित्तच्या या कलाकार मंडळींच्या, अमेरिकेतल्या अल्प मुदतीच्या वास्तव्यात वेळातवेळ काढून, या सगळ्या कलाप्रेमींशी जवळीक साधता आली. अर्थात याचं पूर्ण श्रेय प्रशांतलाच द्यावं लागेल. गेल्या काही वर्षांत या सगळ्यांशी मैत्री झाली. एवढंच नाही तर हे मैत्रीचे संबंध वृद्धिंगत झाले. आजही न विसरता, त्यांनी पाठवलेल्या वाढदिवसाच्या, दिवाळीच्या सहृदय, सस्नेह शुभेच्छा दिवाळीचा म्हणा किंवा कुठल्याही छोट्या-मोठ्या सणावाराचा आनंद द्विगुणीत करतात. .... त्यांच्या सान्निध्यात घालविलेले काही सुखद क्षण, त्यांच्या कलाविष्काराच्या मौलिक आठवणी, मन अगदी प्रफुल्लित करतात.



आता आलेल्या प्रत्येक अनुभवाचं आणि आठवणींचं किती भांडवल करायचं, हा प्रश्न मनात घोळत असताना कधीकाळी आम्ही सहज मैत्रीची आठवण म्हणून दिलेल्या अगदी छोट्याशा, किरकोळ भेटवस्तूंचा अजूनही, इतक्या वर्षांनंतर आवर्जून झालेला उल्लेख, कुठेतरी या मैत्रीच्या नात्यातील स्निग्धता दर्शवितो. आजतागायत, फक्त टीव्ही वरच बघितलेल्या या सगळ्या गुणी, हाडाच्या कलाकार मंडळींना कधी रीतसर आमंत्रित करून, तर कधी आकस्मिक पणे निव्वळ योगायोगाने आमच्या घरी पाहुणचार करता येणं, इथल्या त्यांच्या अल्पश्या वास्तव्यात थोड्याफार प्रमाणात त्यांना काय हवं नको आहे, त्याकडे लक्ष द्यायची संधी मिळणं, या कलेच्या उपासकांचे पाय आमच्या वास्तुस लागणं, हे मी आम्हा उभयतांचे भाग्यच समजते.

**- सौ. सरोज प्रशांत जावकर**

# पहिली हिमवृष्टी आणि धारिणीची रजई

बोचणारा गारवा, त्यावर थंडगार वारा,
निर्मनुष्य वाटा, अबोल ही धरा,
निष्पर्ण तरुवर, नभी निस्तेज भास्कर,
एक आगळीच मरगळ पसरली भूवर.

कुडकूड थंडी, पलंगावर उबदार रजई,
हवेतच सुस्ती, आणि मऊ मऊ गादी,
हातीचे पुस्तक नकळत सुटले,
मग नवल कशाचे जर डोळे मिटले?

निद्रा तुटता सारे दृश्य बदलले
चकित जाहलो, असे नवल कसे घडले?,
निद्रेआधी भासली उदास जी धरणी
तीस शुभ्र चैतन्य दिधले कोणी?

श्वेत मखमली, रुईसम हलकी,
केवढी सुंदर धरणीची रजई!
असंख्य मोतियांनी लखलखणारी
स्वर्गा शोभेल अशी भरजरी!

निष्पर्ण गारठलेली जी होती बिचारी
ती सारी वृक्ष आता हसरी दिसली
फांदीफांदीला रेखीव आणि चकाकणारी
चंदेरी झालर कुणी सजवली?

धवल रेशमी चढवून टोपी
मौजेत डोलती पहा तरूशिखरे
सजली चढवून शाल रुपेरी
घरा घरांची तिरपी छपरे

निरखून पाहता नवल वाढले
शुभ्र मोती उडताना दिसले
जणू पवनाचेच पंख लावूनी
मनसोक्त चौफेर विहरत बसले

" मनसोक्तता तुमची पाहता
वाटले ओळख आपुली जुनी कधीची,
जरी भेट न आपुली पूर्वी घडली,
तरी निखळता तुमची परिचयाची"

'खो! खो!' करीत एक मोती हसला
हळूच माझिया कानावर बसला,
"मित्रा तुझिया गावी सूर्य तापतो
त्रासून जाते भेगाळ धरणी,
तेव्हा अभ्रातुनी बरसते कोणी,
ती माझीच भगिनी वर्षाराणी"

"तृषा भागण्या भूमातेची
वर्षाव करिते चैतन्याची,
ती थुई थुई नाचणारी वेडी,
माझी बहीण तव परिचयाची"

" तिला तुझ्या गावीची गर्मी प्यारी,
मला थंडीची आवड आगळी,
गर्मीत माझे पाणी-पाणी होते
थंडीत ती गारठून बसते"

" मग इथे थंडी बोचरी होता,
सारे जन-जन त्रासून जाता,
धरणीच्या मुखावर मलूलता चढते
मग वर्षाच मजला इथे धाडते"

मग माझ्या आईस बिलगण्या
मी पण का विलंब करावा?
दौडत मी येता अभ्रांतून
हा 'धवलोत्सव' रंगून यावा

येता येता संगे आणली
मज मातेसाठी ही हिम-रजई
स्पर्शास थंड तरी ऊब मायेची
कशी हर्षात मिरवते माझी आई!



- ऋतूज देशपांडे

# मायबोली कट्टा: मराठी साहित्याच्या गप्पांचा छोटासा कट्टा

शिक्षणाच्या, व्यवसायाच्या निमित्ताने देश सुटला, आणि हजारो मैल दूर या अनोळख्या देशात आपली घरटी वसली. 'देश तसा वेष' म्हणत-म्हणत राहणीमान बदलले आणि 'तर्खडकरांच्या' पुस्तकातून शिकलेली 'अस्खलित इंग्रज़ी', नकळत व्याकरणाचे नियम न मानणाऱ्या स्वैर 'American English' च्या वळणावर गेली. नवीन इंग्लिशचे, नवीन जगाचे , काहीकाळ कौतुक जरी वाटले, तरी मराठमोळ्या मातीत पिकलेल्या मराठी साहित्याचा स्वाद कुठेतरी 'miss'  होत होता.




खरं पाहिले तर शाळेत मराठी विषयात कधीच विशेष असे गुण मिळाले नाहीत. शुद्धलेखनामध्ये उकार, वेलांटी, रूपे बदलणाऱ्या मायावी राक्षसाप्रमाणे कधी 'ह्रस्व' आणि 'दीर्घ' अशी रूपे बदलत भीती घालत. वृत्त, छंद, समास, संधी ह्या नेमक्या परीक्षेत फजिती करत. 'संदर्भासहित स्पष्टीकरण' देताना नेहमीच नाकी नऊ येई. 'कोण कोणास काय म्हणाले?' हे आम्ही का लक्षात ठेवावे हे कधीच कळले नाही. पण तो तीन तासांचा पेपर आणि प्रगती(?)पुस्तकावर लिहिलेले गुण यांचा कितीही राग आला तरी मराठी शाळेत शिकल्यामुळे मराठी कविता, कथा, कादंबऱ्या अशा वाङ्मय वटवृक्षाच्या छायेत आम्ही लहानाचे मोठे झालो.  या वाङ्मय वृक्षावर कुसुमाग्रज, केशवसुत, शांता शेळके, बहिणाबाई, पु ल देशपांडे अशा कितीतरी साहित्य सुमनांचा सुवास आमच्या बालपणात नकळत एकजीव झाला. 'एक तुतारी द्या मज आणुनी... '  म्हणताना नकळत आवेश येत असे, तर 'श्रावण मासी हर्ष मानसी...' ऐकून अगदी पावसात भिजून आल्यानंतर यावी तशी तरतरी अंगावर येत असे. 'चिमणराव', 'पंत', 'गोकुळ' सारख्या अजरामर व्यक्तिरेखांशी आमची कधी गट्टी झाले ते कळलंच नाही.

देश सुटला, शिक्षण संपले, ऑफिस ते घर असे दैनंदिनीचे चक्र फिरू लागले आणि जीवनात कुठे तरी नीरसता येत आहे असे जाणवू लागले. साहजिकच... थकलेल्या पक्षांनी पुन्हा हिरव्यागार  वृक्षावर काहीवेळ विश्रान्ती घ्यावी अगदी तशीच आम्हालाही आठवण झाली शाळेच्या अंगणात सुटलेल्या मराठी वाङ्मयाच्या सदाहरीत  वटवृक्षाची, आणि त्याच्या थंडगार छायेची. नाही म्हणायला भारतातून येताना काही कादंबऱ्या, कविता संग्रह शिदोरीत बांधून आणले होते ... पण शिदोरीतल्या गोष्टी किती दिवस पुरणार?... सुदैवाने आम्ही डेट्रॉईट मध्ये राहतो आणि इथे अम्हासारखेच कितीतरी मराठी जन विसाव्यासाठी वाङ्मय वृक्षाच्या शोधात होते. त्यातूनच जन्म झाला ' मायबोली कट्टा' या छोट्याशा 'ग्रुप' चा.

मायबोली कट्टा हा केवळ WhatsApp किंवा Facebook ग्रुप नसून, इथे मराठीप्रेमी दर महिन्या-दोन महिन्यात एकदा भेटतात आणि मराठमोळ्या गप्पांत रंगून जातात. या कट्ट्यावर कधी बालभारती-कुमारभारतीतील आवडत्या कवितांचे वाचन होते, कधी कादंबऱ्यांवर चर्चा होते, कधी इतिहासाच्या गप्पा रंगतात, कधी कथाकथन होते, तर कधी  सामाजिक प्रश्नांवर चर्चा होते. कधी तबला- drums च्या तालावर मराठी गीतांची 'गीतबोली' होते.  कॉलेजच्या कट्ट्यावर खुलणारे बरेचसे रंग मायबोली कट्ट्यावर पुनः अवतरतात.

साधारण तीन वर्षांपूर्वी, म्हणजे २०१४ च्या गणेश उत्सवामध्ये, काही मित्रांनी मिळून मायबोली कट्टा स्थापन केला आणि आज मराठी साहित्य विश्वाचं एक नवं दालन बनून हा कट्टा उभा आहे. विशेष म्हणजे मायबोली कट्ट्यावर येण्यासाठी लेखक असण्याची, कवी असण्याची किंवा मराठी साहित्याचे प्रखर वाचन असण्याची अशी कोणतीच अट नाही.... अट एकच, मराठी साहित्यात इंटरेस्ट हवा.  कट्ट्याच्या प्रत्येक भेटी आधी एक विषय निवडला जातो. 'माझी आवडती कविता', 'आवडती कथा/लेख', ‘आठवणीतील दिवाळी’, ‘देशभक्तीपर साहित्य’, ‘मराठवाड्यातील दुष्काळ’ असे वेगवेगळे विषय इथे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून शब्दबद्ध होतात. कधी ग. दि. माडगुळकर, कुसुमाग्रज, रणजित देसाई अश्या साहित्यकारांचे साहित्य कट्ट्याच्या भेटीचा विषय ठरतात आणि सारे सभासद जमेल तसे या महालेखाकांचे साहित्य जमवून प्रस्तुत करतात. कधी कट्ट्याचे सभासद त्यांचे  स्वतःचे  किंवा आप्त-मित्रांचे लेखन कट्ट्यावर प्रस्तुत करतात. आणि हे सारे अगदी अनौपचारीक. आमच्या सौभाग्याने मायबोली कट्ट्यावर कवियित्री डॉ संजीवनी तोफखाने, उद्योगपती - लेखक डॉ श्री ठाणेदार अशा

मान्यवरांनी भाग घेतला. त्यांच्याशी मनमुराद गप्पा मारण्याची, त्यांच्या साहित्याला, अनुभवांना जवळून बघण्याची संधी मायबोलीच्या सभासदांना मिळाली.



गेले तीन वर्षे सातत्याने रंगणाऱ्या या मायबोली कट्ट्याने आम्हा सभासदांना मराठी साहित्यातील माणिक-मोती पुन्हा वेचण्याची संधी दिली. दर महिन्या-दोन महिन्यात गजबजणारा मायबोली कट्टा आम्हाला दोन तास एका वेगळ्या विश्वात घेऊन जातो. कट्ट्याचे सभासद कट्ट्यावरच्या पुढच्या भेटीची एकदम आतुरतेने वाट पाहतात तर त्यात नवल कशाचे?

मायबोली कट्टा हा सर्व मराठी रसिकांसाठी खुला आहे. जर आपल्यालाही ह्या कट्ट्यावर सामील व्हायचं असेल तर [rutooj@gmail.com, akshaykulkarni44@gmail.com, kulkarni.pmk@gmail.com] या mail-ids वर 'mayboli katta' अशा आशयाचा ई-मेल करा आणि तुमचा phone number पण share करा. तुम्हाला या group च्या भेटीची तारीख, स्थळ आणि विषय कळवले जातील.

**- मायबोली कट्ट्याचे सभासद**

# Pen it!

*There was a time where the best mode of communication was when someone picked up the pen and found a decent looking piece of paper and wrote down their feelings to the best of their abilities.*



*For most of us it began with,*

*Dear…..*

*How are you?*

*Yes, we actually spelled the entire word investing ink to populate the real estate we were writing on. That was the era of being connected with your heart and soul. We spent time in buying the paper. We spent time in forming the sentence and thinking of the topics to write. We spent time on writing, decorating, sealing the envelope, attaching a stamp and actually going to the post office to mail it to someone who really mattered.*

*Every word written expressed what the sender actually felt about the receiver. Secrets were shared and plans were made. The speed was slow but the effect was more. The excitement of getting a letter could never be a bore. Holding the paper, enjoying each word. Not always were words spelt right since backspace and autocorrect were missing…right! Some drew flowers while some finished with a simple line. Every letter had a personality of its own and every time it came, your heart would feel the sound. Why should such a beautiful art disappear to give way to LOL and HRU dear? Technology gave us the best tools but we utilize it in a way to make ourselves like fools.*

*A greeting card….OH the charm! Colorful images… rich text…card stock paper and the joy of reading a verse or rhyme! So many times we have spent hours to choose the best card with the best words that brought a smile or a tear to whoever held it. Today we forward messages we did not write, we like posts we did not read and we share videos we mostly did not watch till the end!*

*Feels like winter in the land of feelings where every thought is frozen and every emotion is buried under layers of snow. What will it take to break this ice? What does it take to bring the warmth back to the heart?*




*I would urge you to try and write something today to someone you know and never wrote to for a long time. Mail it… Wait for the call and then enjoy the feeling of true happiness. Yes, it is worth it. You do have the time. Do not type and print.* ***Write it down****. Let the emotions flow and let the loved ones know!*

**Yours truly**

**- Mansi Dahanukar**


ANY DATA.
ANY FORMAT.
ANY TRADING PARTNER.
ANYWHERE.
SIMPLE, COMPLETE, COST-EFFECTIVE SOLUTIONS THAT IMPROVE ELECTRONIC COLLABORATION BETWEEN GLOBAL PARTNERS.
iConnect's suite of electronic commerce and EDI solutions includes EDI in the Cloud, Value Added Network Services, iExchangeWeb - Web EDI, Supply Chain Management, Data Transformation Services and XML Data Services. iConnect provides for the successful transformation and secure delivery of business critical information between organizations irrespective of data format, technology and language. Visit iconnect-corp.com or call 877-327-9334 to learn more.
iConnect

## The Mesmerizing Era of Romance – 90's

*"Bade Bade deshon main aisi choti choti baatein hoti rehti hai"………*

*"Someone somewhere is made for you…."*

Aah! The utter mention of these famously repeated dialogues takes me back to my teenage years of believing in the magic of love….

The 90's to me were the most influential. Being a total movie buff, my love for Bollywood and also, of course, my age at the time played a big part in just how much of an impact this era had on me when this cheeky, charming, dimple smiled and tousled hair boy with a crooked nose and Z shaped eyebrows swept the nation (India) by a storm. Yes, I am talking about none other than the King of Romance – Mr. SRK. This seemingly imperfect yet somehow magnetic personality made every age group fall in love with the idea of "falling in love". All he had to say was "*palat..palat…*" to Kajol and all of a sudden everyone in the audience wished she turned around and had goosebumps when she actually does turn around….his smile and lop sided grin with this arrogant belief that now this girl belongs to me and only me…made every girl I know wish they would also meet someone just like him……



The magic weaved in all our hearts through this one movie Dilwale Dulhania Le Jayenge (released in 1995) and we started listening to the songs over and over again on repeat on the stereo or Walkman morning, noon and night. We, meaning a couple of my equally movie crazy friends, even talked about going on a trip somewhere - just us after we graduated (well I was just in high school, but who is counting the years right?) and all of us carried this hope that we will also meet someone and fall in love hook, line and sinker. Ha-ha! How crazy and innocent were we? Dancing to the tunes of "*Mere khwaboon mein jo aaye...*" at friends' parties *or "Mehendi laga ke rakhna"* at every wedding we were totally mesmerized by this Aditya Chopra classic. After watching this movie probably at least 15-20 times, we could remember and repeat each and every dialogue much better than anything we ever studied for in college….



Well, we hadn't even pulled ourselves out of this reverie and there comes "*Eh* Rahul" who puts a cast on my already tender heart as this passionate Dance Director in Dil Toh Pagal Hai and soon we find ourselves humming "*Are re are yeh kya hua…*" and dancing to "*Chak dhoom dhoom", "Le Gayi Le Gayi"* and the infamous dance off between Karishma and Madhuri in "*Dance of Envy".* I honestly was so smitten with the idea that "someone, somewhere is made for you" and that the Almighty is going to let me know or point me in the right direction that my parents were genuinely worried about my future. This was another movie which I watched multiple times with my friends and family and equally enjoyed every single time. This movie completely changed the concept of dances in Bollywood movies thanks to Mr. Shiamak Davar! I remember trying to emulate the steps from the dances in front of the mirror with my friends whenever they came over to study or just chit chat. With the ethereal charm of a Yash Chopra classic, where everything looked and felt like a dream, a dream which many wanted to turn true was another gem of the 90's.



A few other hits which made the 90's the golden era or romance, where majority of the stories were pretty predictable (but still equally loved), were Hum Aapke Hain Kaun, Dil, Rangeela (another one of my all-time favorites), Akele Hum Akele Tum, Kabhi Haan Kabhi Naa and many more. This era resonated with me deeply as I was just a simple gal growing up in a town called Pune with the usual dreams and these movies made those dreams livable on the big screen. With minimal influence of the internet, the western culture wasn't much in the picture in terms of how "real" or "relatable" or "believable" these movies were. They became popular at the time for the simple reason that "Dreams sell".

Fast forward to today and I ask myself… If I saw these movies today would I still be just as smitten, just as mesmerized? Maybe not… but then again who knows? Because… "***Bade bade deshon mein aisi choti choti baatein hoti rehti hain Senorita!"***

**- Reshma Upasani**



## पत्रपल्लवी

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. माझा मुंबईचा एक मित्र अमेरिकेत शिक्षण घ्यायच्या विचारात होता. भारतातून हे अर्ज करणं खर्चाचं व जिकिरीचं काम होतं. अनेक आव्हानांपैकी विशेष लक्षात राहण्यासारखं म्हणजे एक निबंध लिहून पाठवणं. तोसुद्धा 'पर्यावरण', 'स्त्रीशक्ती' सारख्या सरळसोट विषयांवर नसे. एकदा त्याला विषय दिला होता, 'समजा म्हातारपणी तुम्ही पाचेकशे पानांचं आत्मचरित्र लिहायचं ठरवलंत, तर १५७व्या पानावर काय लिहाल? ते लिहून पाठवा'! हे आव्हान त्याने पेललं त्याला आता ३० वर्षे होऊन गेली. तो इंग्लंडमध्ये असतो म्हणजे पुस्तकाच्या पुढील आवृत्तीत बदल केले असणार ...आमची दोन देशांतील समांतर जीवनं आत्मचरित्राच्या अडीचशेव्या पानावर येऊन ठेपली आहेत.... मागे वळून पाहते आहे, माझ्या १५७व्या पानावर काय होतं?

मी १९९१ साली पदव्योत्तर शिक्षणासाठी अमेरिकेत आले. मजल दरमजल करीत शिक्षणाच्या ठिकाणी पोचायला ८ दिवस गेले. एक दिवस विश्रांती, ब्यागा उघडणं, त्यातल्यात्यात चांगले कपडे घालून आरश्यासमोर शुद्ध व स्पष्ट इंग्रजी बोलण्याचा सराव करून पदार्थविज्ञान विभागात पोचले. संशोधन/शिक्षण यासाठी नेमून दिलेले मार्गदर्शक/प्राध्यापक भेटले. ओळख पटताच ते म्हणाले "I was expecting you. There is some correspondence for you in your mailbox". अरे, माझ्यासाठी काय आले असेल? तेंव्हा ॲमेझॉन हे फक्त खोरे म्हणून परिचित होते आणि कर्जाची थकबाकी करायला हातात क्रेडिट कार्ड देखील नव्हते, मग काय असेल? तिथे जाऊन बघते तर एक ओळखीचे व दुसरे अनोळखी अक्षरातील अशी २ पत्रं. एक आईवडिलांनी पाठवलेले आणि दुसरे मित्रमंडळींनी मिळून लिहिलेले. ती पत्र बघून मला जो काही आनंद झाला त्याला आज २७ वर्षांनीही उपमा सुचत नाही. पत्र न उघडताच घळाघळा अश्रू वाहू लागले ते तसेच वाहू दिले. जगप्रसिद्ध जर्मन कवी 'गटे' याला कालिदासाचे 'शाकुंतल' हे नाटक इतके आवडले की तो या नाटकाचे पुस्तक डोक्यावर घेऊन नाचला, माझी अवस्था तशीच झाली. खरं म्हणजे तसा वेडा आनंद नंतर फारच क्वचित झाला.

घरी येऊन त्या पत्रांची पारायणं केली आणि लगेच उत्तर लिहायला बसले. भावनेच्या भरात पानावर पानं लिहिली गेली. त्यानंतर २-३ वर्षं हे चालू राहिलं, पत्रातल्या शंकाकुशंकांना उत्तर देणं "अगं मूग डाळ आणि मसूर मधला फरक कळत नव्हता तुला, आता जेवतेस काय?" "मित्र वगैरे ठीक आहेत पण लग्न करताना आपल्यातलाच बघ हं..." वगैरे वगैरे .



उमेदवारीच्या काळात या पत्रांनी तारलं. काही उपदेश व दिलासा देणारी तर काही हलकीफुलकी ...

'शेजारच्या समीरला पहिलीत घातलं, त्याच्या अभ्यासाचं काही खरं नाही'. (त्याची मुलगी आता शाळेत जाते आणि तिच्या अभ्यासाचं बरंच खरं आहे)

जोश्यांच्या सुनेला दिवस आहेत असं आमची आजी म्हणते - ती हळू बसते म्हणे! (ते खरं होतं, यथावकाश मला जोश्यांचंच पत्र आलं....)

कॉलेजमधल्या मैत्रिणींनी लग्नं ठरवलेली व ठरलेली कळवली - मित्रांनी .... क्वचित प्रत्यक्षात न जाणवलेला मोकळेपणा, भावुकता पत्राद्वारे व्यक्त केला ...

काही वर्षांनी ("आपल्यातला" हे डबल ब्यारेल नावावरून कळलंच असणार) जीवनसाथी इथेच पण वेगळ्या राज्यात असताना भेटला. फोन करणं परवडत नव्हतं आणि email पुरेसे, आपलेसे वाटत नव्हते, अनेक आणाभाका घेतल्या त्यासुद्धा पत्राद्वारे.

"पाठविसी ते सगळे सगळे

पहिल्या ओळीमध्येच मिळते

पत्र पुढचे त्यानंतर पण

वाचायाचे राहून जाते”

ही भावना अनुभवायला मिळावी अशी पत्रं लिहिली आणि मिळाली.

आता पुलाखालून बरंच पाणी गेलं. पोस्टकार्डावरून गिरगाव ते डोंबिवली पत्र-व्यवहार चालायचा त्या जमान्यातली मी, आता Texting द्वारे लीलया निरोप धाडते. गुगल hangout किंवा व्हाट्सऍपच्या माध्यमातून निरोप पाठवला की लगेच पोचतो, तो वाचला की नाही हेही लगेच कळते, इतकंच काय तर समोरचा उत्तर देताना पण '...writing' हेही दिसते. वाट पाहण्यातली आर्तता संपली. पण इंतेजारमें जो मजा वो मुलाकात में कहाँ .... "

पत्र लिहून उत्तर येण्यात जी काही मजा आहे त्याला तोड नाही. ही दुहेरी गरज आहे, मिळावं असं वाटतं आणि लिहावं असंही. मला ते हातात धरताना लिहिणाऱ्याचा चेहरा डोळ्यासमोर येतो, विचार करताना पडलेल्या आठ्या, खोडलेले शब्द, विचारांचा व लेखनाचा वेग यातील तफावत, हे सगळं खूप खूप भावतं, मला तो दोघांच्यातला दुवा वाटतो, त्या क्षणी त्या सगळ्या बातम्या, आठवणी फक्त माझ्यासाठी असतात असं वाटतं.

प्रत्यक्ष भेटीत किंवा स्पर्शानेही व्यक्त केलेल्या काही जाणिवा, भावना मला वाटतं आपण लेखी शब्दांद्वारे अधिक चांगल्या व्यक्त करतो - मग ती सुनीताबाई व जी.एंची पत्रं असू देत वा शंभरसव्वाशे वर्षांपूर्वीची इंग्लिश व फ्रेंच लेखकांची सखी/सख्याला लिहिलेली अगदी शरीरसुखाविषयीही रसभरीत वर्णनं असू देत. म्हणूनच संपर्काची इतकी माध्यम असूनही texting सध्याच्या पिढीला sexting (ऐकीव बातमी) गरजेचं वाटतंच की!

पोस्टकार्डावरनं आठवलं आमच्या ओळखीत एका काकांची पत्नी कोकणात माहेरी गेली होती - ६० वर्षांपूर्वीची गोष्ट आहे -. काकू सांगितल्यापेक्षा माहेरी जरा जास्तच रमल्या. काकांनी एक पोष्टकार्ड पाठवलं (कोकणच्या भाषेत, 'पाठवलनी' लिहिणार होते), त्या कार्डावर फक्त एक भलंमोठं प्रश्नचिन्ह लिहून ते पाठवलं. ४ दिवसात काकू सासरी परतल्या. आज जर का माझ्या नवऱ्याने असं पत्र पाठवलं तर मी उत्तरादाखल उद्गारचिन्ह किंवा (जास्त भडकले तर) पूर्णविराम लिहून पाठवेन.

पोस्टकार्ड की जोडकार्ड पाठवलं यावरून 'मुलीच्या बापाला मिजास खूप हो' ही चर्चा - पत्रलेखनातली ती जातीव्यवस्था आता नामशेष झाली आहे. लग्नाची आमंत्रणं सुद्धा हल्ली WA वाटे येतात.




मी मात्र अजून पत्र वेडीच राहिले आहे. अजूनही गप्पा रंगल्या, कोणाची प्रकर्षाने आठवण आली की त्या व्यक्तीला पत्र लिहायची तीव्र इच्छा होते, कधी त्या इच्छेचं रूपांतर कृतीत होतं आणि माझं नशीब चांगलं असेल तर त्या विस्कळीत पण मनस्वी पत्राला उत्तररूपी प्रतिसादही मिळतो मग पुन्हा एकदा मी ते पत्र डोक्यावर घेऊन नाचण्याइतकी खुश होते. आणि मग “Got your letter” हे WA किंवा SMS ने कळवते...

कालाय तस्मै नमः

**- ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर**

# CENTRAL HOME HEALTH CARE, INC.

Quality Home Health Care Since, January 1985
JCAHO Accreditation Since 1991



Do You Have……..

1. Joint, Neck, or Back Pain or Joint Stiffness?
2. Poor Circulation or have a Wound that is not healing?
3. Diabetes, Heart, and/or Respiratory Problems?
4. A Cardiac diagnosis that affects your quality of life?
5. A previous Stroke, Accident or Fracture(s)?
6. Difficulty with walking or a history of falls?
7. Or will have a Hip/Knee/Shoulder Replacement?
8. Problems with frequent Hospitalizations?

If so, then you may be eligible for home care services from Central Home Health Care.

WHO PAYS?

Your Insurance will pay **IN FULL** if you have Medicare, Medicaid, BCBS, Auto, or Private Insurance.

WHAT YOU NEED TO DO?

Call our number below or ask your physician/social worker to call us to make a referral.

WHAT DO WE OFFER?

Nursing, Physical Therapy, Occupational Therapy, Speech Therapy, Medical Social Work, Home Health Aide Services, Registered Dietician Services.

WE COVER THE METRO-DETROIT (TRI-COUNTY) AREA

**Ph: (800) 698-5410 – Fax (248) 569-5412**

**Owned and Operated by the Walvekar Family**

20245 W. 12 Mile Road, Ste. 100, Southfield, MI 48076.

www.centralhomecare.com

## अमादक पेयाची मादक किमया ......

शायद मेरे शादीका खयाल दिल में आया है
इसिलिये mummy ने मेरे तुम्हे चाय पे बुलाया है.......

आठवतं का हे १९८३ मधली 'सौतन' सिनेमातलं राजेश खन्ना आणि टीना मुनीम यांचं गाणं ?

आतापर्यंत आपण भरपूर हुंडा, मोटर, स्कूटर इत्यादी आंदण देवून चांगले जावई मिळवल्याच्या कथा ऐकल्या आहेत , परंतु Bollywood च्या या mummy चा चहा च्या कपावर बोळवण करायचा विचार दिसतो. कित्ती हुशार आई जिने चहाची खरीखुरी ताकद ओळखली .
राजेश खन्ना आणि चहा यांची chemistry बॉलीवूड ला नवीन नाही. " गर्मी में गरम चाय शरीर को ठंडक पाहुचता है " हे राजेश खन्नाच्या तोंडच वाक्य अजूनही डोक्यात कायमच कोरलं गेलं आहे.

चहा हे पेय ब्रिटिशांनी भारतात आणलं आणि गूळ पाण्याच्या आदरातिथ्याची जागा केव्हा घेतली हे कळलेच नाही . ब्रिटिशांनी केलेल्या सुधारणांत रेल्वे, विद्यापीठ , रुग्णालय यांच्यासोबत चहाचा सुद्धा महत्वाचा समावेश आहे . अमृत म्हणतात ते बहुधा चहाच असावा . या पेयाला वेळ , काळ, स्थळ याचे बंधन नाही . चहा हे केव्हाही, कुठेही, कितीही, कसाही प्यावयाचे एकमेव पेय आहे. Fancy हॉटेल मध्ये प्या किंवा टपरी वर प्या , आनंद तेवढाच मिळतो. कधी कधी तर टपरी वरच्या सणसणीत चहाची आगळीच चव असते. मला वाटतं चहा इतकं addiction दारू सुद्धा देवू शकत नाही. चहावर अजून " एकच प्याला " कसा झाला नाही ह्याचेच आश्चर्य वाटते . खूप लोक प्रवासाची सुरुवात सुद्धा चहाचा कप ढोसून " one for the road " म्हणून करतात.

आपण घरी आलेल्या पाहुण्यांना पहिला प्रश्न विचारतो, "काय चहा घेणार नं ?" कोणी "मी चहा घेत नाही" म्हटले तरच "कॉफी घेता का?" अशी offer देतो. अगदी सदाशिव पेठेत गेलात तरीसुध्दा " चहा घेता का दोन पळ्या? " अशी विचारपूस होते ( असे ऐकिवात आहे ). म्हणजे आपली लोकांच्या आदरातिथ्याला सुरुवात चहापासून होते. आजकाल बाजारात चहाचे वेगवेगळे फ्लेवर्स मिळतात. अद्रक, इलायची, दालचिनी , मसाला या भारतीय फ्लेवर्स पासून strawberry ,cherry , chamomile या अमेरिकन रुचीला आवडणारे असंख्य flavours उपलब्ध आहेत. परंतु ओरिजिनल चहाची जी मादक किमया आहे त्याला तोड नाही हे मात्र खरे.




मला चहाची सवय लागली ती माझ्या वडिलांच्या अति health conscious स्वभावामुळे . आमच्या घरी पाणी उकळून पिण्याची सक्त ताकीद असे. मला शाळेत जाताना उकळलेल्या पाण्याची बाटली घेवून जावे लागे . खूप राग येत असे . याचा विपरीत परिणाम म्हणजे जास्त immunity आलीच नाही. गावात कुठली साथ आली की पहिला बकरा मी पडत असे, असो. आम्हाला घराबाहेरचं खाण्यास परवानगी नसे . त्यावेळेस उन्हाळ्यात कोणी सरबत विचारले की नको म्हणून फक्त चहा प्यावा लागत असे. कारण चहा उकळलेला germ free . त्यामुळे. "गर्मीमे गरम चाय शरीरको थंडक पहुंचाती है " या ब्रीदवाक्या प्रमाणे सरबताची तहान चहावरच भागवावी लागत असे. ही चहाची सवय लागली ती अशी आणि त्याचे हळू हळू चटकेत रुपांतर झाले . आज हे शरीराचे engine चहारूपी पेट्रोल शिवाय चालूच शकत नाही. मला कुठलाही चहा चालतो अगदी टपरी वरचा असो किंवा ST stand वरचा!! आजकाल मी Girnaar च्या instant tea ची पाकिटे purse मध्ये टाकल्या शिवाय बाहेर पडत नाही .



ब्रिटीशांनी popular केल्याला चहाला अमेरिकन history, politics मध्ये कमी का महत्व आहे ? " Boston Tea party" " Republican Tea party" etc. अमेरिकेच्या स्वातंत्र्य चळवळीला सुरुवात झाली ती सुद्धा BOSTON टी पार्टीनेच. British East India कंपनी भारतीय चहा अमेरिकेला विकत असे. Boston शहरातल्या अमेरिकन क्रांतिकारकांनी बोस्टन बंदरातली चहाची boxes ईस्ट इंडिया कंपनीच्या जहाजावरुन उतरवून बंदराच्या पाण्यात बुडवली. तेव्हांपासून अमेरिकन कॉफी पिऊ लागले.

चहा introduce करणाऱ्या ब्रिटिशांना आणि Girnaar instant tea ला प्रणाम करून हे चहा महात्म्य येथेच संपविते.

- **शमा सुखटणकर**






## Indira's Emergency, Gandhiji and I

Growing up in post-Independent India was exciting even for young children who did not quite understand what Independence meant. There was a certain energy in the air, and grown ups would routinely discuss incomprehensible things involving Gandhiji, Nehru, the Congress Party and the RSS. While my parents were not politically influenced by the RSS, my mother's family certainly was. They were close to Dr. Hedgewar, Guruji Golwalkar, and even his eventual successor Mr. Deoras. While the ethos in that branch of the family was not anti-Gandhiji, they certainly did not extol him. I recall one of my uncles referring to Gandhiji's death with a quote from the Mahabharata - "इंद्राय तक्षकाय स्वाहा:"!

My mother had her own independent opinion though. She used to recall with reverence having met with Gandhiji in person as a child. The Chief Minister of a princely state was a Congress-wadi, and by virtue of his position and inclination, closely involved at a senior level with the Gandhian movement. His daughter was my mother's best friend. That friendship pulled her into the street marches inspired by Gandhiji, and got her involved in some minor confrontations with the British police.

But I don't think that these anecdotes or opinions registered on my carefree childhood. As a school-going kid, I enjoyed October 2 being a holiday and was thankful to Gandhiji for it. But I did not like having to complete the daily homework designed to improve my English and handwriting - writing down extracts from the Mahatma's autobiography every day! So my early feelings for Gandhiji were kind of ambivalent.

I remember that we had a fabulous Hindu Mahasabha-wadi orator as our Marathi teacher. He was an admirer of Veer Savarkar and his strident nationalism. I had figured out how to get better grades in his class - all you needed to do was to refer to or quote Savarkar's writings and biographical anecdotes in appropriate places and you would get that extra little advantage!

But I do not think there was anything cynical or politically astute about my behavior. It was just that minor cunningness that children display once in a while - I remained naive throughout my academic career (and if what my wife tells me is correct, remain so even today).




I came to the United States in 1975, a couple of months after Indira Gandhi declared her “Emergency”. I had led a hectic professional life after graduation, but had remained very green in terms of worldly wisdom. Bombay was not my hometown, and outsiders living there would take their time adjusting to the rigors of their metropolitan existence. The prevalent local wisdom about the Emergency was that of some relief (and even satisfaction) at the new orderliness that the Emergency had introduced into the bureaucracy and the improved adherence of the railway system to its timetables on which the working bees depended so heavily for their daily survival.

But once I came to the United States, the reaction to Mrs. Gandhi's Emergency seemed to be strikingly different. Not that the press gave extra column space to India when the bicentennial was round the corner; but foreigners such as I do tend to seek out articles and news items about the country they leave behind, and my readings included not just the local journalists I had never heard of, but also very powerful writers of Indian origin, such as Ved Mehta in the New Yorker.

Their reaction was uniformly anti-Emergency, full of an awareness of individual rights and genuinely concerned about the path that India was being marched on by the iron fisted Lady who had been publicly identified in India as Durga Mata and praised with slogans like "Indira is India, and India is Indira".

At work, the more enlightened American colleagues could be irritatingly condescending. "I can understand Mrs. Gandhi's compulsions, you know ... after all she has to worry about feeding hundreds of

millions of poor". Compared to such interaction, I almost preferred the questions of the ignoramus who actually asked me if I was not afraid of going for evening walks in Bombay... would it not be dangerous with the tigers and such beasts that may be lurking around.

For a while, I gave up talking to others on the political situation. It was too painful to reconcile the new perspectives that were sprouting up all around me with the assumptions I had been perfectly at ease with.

The anguish caused sleepless nights. Having been forced to attend Professor Kamla Choudhary's Organizational Behavior classes a few years earlier, I even wondered if this was what they meant by Identity Crisis - I could not know for sure, but if it was indeed that, I was determined to come out of my misery in a constructive fashion and "emerge as an adult in harmony with himself and his surroundings", courtesy Kamla Choudhary again!

Against this background, I came across a copy of Gandhiji's autobiography in the local library in Radnor, Pennsylvania (surprisingly they even had copies of a couple of my late Father's books).

I began to read "The Story of My Experiments with Truth" with renewed and intense interest. What were boring passages that we had to rewrite and learn by rote during middle school now revealed new meanings and triggered thought processes I did not know I was capable of. I could readily relate to many of the growing-up dilemmas Gandhiji talked about. The basic questions that occurred to him seemed to be not very different from the ones I had faced without dwelling upon them long enough – life had been too interesting to worry about nagging self doubts.



Simultaneously I was beginning to admire the sincerity of Gandhiji's logic to investigate the validity of his assumptions, and the intellectual honesty with which he was willing to discard his previous convictions because they would not withstand his own scrutiny any more.

***Suddenly it seemed okay to be plagued with doubts and questions. If one was sincere in facing them and pursuing them at one's own speed, one may come to satisfying conclusions eventually, and on one's own. That reassurance seemed rather promising.***

What I needed to do was to be persistent in seeking answers. I had to be patient with myself, and remain open to looking at perspectives that seemed discordant with my prior thoughts and articles of faith.

I am not sure I explicitly came to those conclusions at that time in the mid-seventies, like I see them so clearly today. But somehow a reading of the autobiography had brought a lot of peace to my troubled mind.

Looking back, my admiration for Gandhiji is very personal. But its seeds originate not so much in his having brought freedom to the Indian Nation. I admire Gandhiji and I am grateful to him because he set me free to look at life's challenges with optimism.

- **Anonymous (The author does not want to disclose his/her identity.)**

# आठवणी रेडिओ आणि टीव्हीच्या

आठवणी या कडू -गोड असतात असे म्हणतात. पण १९७० मधल्या आठवणी बऱ्याच गोड आहेत. ते दिवसच असे होते - थोडक्यात समाधानी असण्याचे! १९७० ते १९९० च्या दशकांतील रेडिओ व टीव्हीच्या आठवणीही अशाच आहेत.

१९७६च्या आधी रेडिओ हा मनोरंजनाचा अविभाज्य भाग होता. त्या वेळी घरात मोठे बोजड रेडिओ असत. लहानपणी ते आणखीच मोठे वाटायचे. रेडिओतून बोलणारी माणसे ही त्यात बसूनच बोलत असतात अशी कल्पना माझ्या (बाल) मनाने तेंव्हा केली होती! दिवसाची सुरवात पहाटेच्या भक्ती गीतांनी व्हायची. नंतर बातम्या व शेतकऱ्यांसाठी वार्तापत्र. दुपारी ११-११:३० च्या दरम्यान आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून लागणारा "कामगार सभा" हा कार्यक्रम माझ्या विशेष स्मरणात आहे. त्यात लोकगीते ऐकायला मिळत. तेंव्हा ऐकलेली "ह्यो ह्यो ह्यो पाव्हणा", "आली आली हो भागाबाई" अशी गाणी आजही ऐकायला गोड वाटतात. दर बुधवारी रात्री "आपली आवड" ही न चुकता ऐकत असू. विविध भारतीवर जयमाला, बेला के फूल, आपकी फर्माईश, भूले बिसरे गीत ऐकणे ही दैनंदिनी होती. बिनाका गीतमाला हा रेडिओ सिलोनवर लागणारा फार जुना कार्यक्रम मी थोडा फार ऐकला. नंतर त्याचे विविध भारतीने सिबाका असे नामांतर केले. त्यांतील गाण्यांपेक्षा अमीन सयानींचा आवाज व शैली अविस्मरणीय होती.





१९७०चे दशक संपताना टीव्हीने हळूहळू घराघरात पाऊले टाकण्यास सुरवात केली. प्रथम फक्त काही सधन घरांतच टीव्ही असायचा. तेंव्हा शेजारी जाऊन टीव्ही बघण्यातही कमीपणा वाटत नसे! दूरदर्शन हे एकमेव चॅनेल व फक्त संध्याकाळी प्रक्षेपण असे. सुरुवातीचा दूरदर्शनचा लोगो व म्युझिक हे अजून स्मरणात आहे. दर रविवारी सकाळी "साप्ताहिकी" हा न चुकता बघण्याचा कार्यक्रम होता! आता हे सर्व परीकथा वाटत असले तरी सत्य होते. त्या वेळचे लोकप्रिय मराठी कार्यक्रम म्हणजे किलबिल, गजरा, ज्ञानदीप, आमची माती आमची माणसं, प्रतिभा आणि प्रतिमा, इ. तेंव्हा संताकुकडी व आवो मारे साथी हे गुजराती कार्यक्रम का लावायचे असा मला प्रश्न पडत असे. हिंदीमध्ये दर गुरुवार न चुकता छायागीत पाहण्याचा असायचा, तर शुक्रवारी फूल खिले हैं गुलशन गुलशन. गोल चेहऱ्याची गोड बोलणारी तबस्सुम छान गप्पा मारायची. टीव्हीवर बातम्या बघायलाही मजा यायची. भक्ती बर्वे, स्मिता तळवलकर, प्रदीप भिडे, ज्योत्स्ना किरपेकर, अनंत भावे ही मंडळी घरचीच वाटायची.

१९८४ला टीव्हीवर मालिकांची सुरवात झाली "हम लोग" या सुंदर मालिकेने. त्यानंतर बुनियाद, ये जो हैं जिंदगी, नुक्कड, मालगुडी डेज, वागले की दुनिया या मालिका लोकप्रिय झाल्या. गाजर खाणाऱ्या करमचंद जासूसलाही लोकांनी डोक्यावर घेतले. दर रविवारी सकाळी जेंव्हा रामायण (नंतर महाभारत ) लागत असे तेंव्हा रस्ते ओस पडत असत! मराठीतली माझी आवडती मालिका होती चिमणराव आणि गुंड्याभाऊ. दरम्यान १९८२ नंतर टीव्हीने कात टाकली आणि कृष्णधवल टीव्ही रंगीत झाला. दूरदर्शनने मोठ्या दिमाखात प्रजासत्ताक दिनाचे आणि एशियन गेम्सचे रंगीत प्रक्षेपण केले. १९८८मध्ये सुरु झालेली श्याम बेनेगलची "भारत एक खोज" ही मालिका लाजवाब!

१९९०च्या दशकात झी, सोनी व इतर अनेक खाजगी वाहिन्या सुरु झाल्या आणि दूरदर्शनशी प्रामाणिक असलेला प्रेक्षक भुलला. वाहिन्यांच्या जंजाळात हरवला. चॅनेल्स विकण्याऱ्यांनी मनोरंजनाचा बाजार केला. पहिली मजा आता राहिली नाही. निखळ करमणूक हरवली.




तेव्हा इंटरनेट नव्हते, स्मार्ट फोन काय साधे मोबाईल फोनही नव्हते, प्रत्येक खोलीत टीव्ही नव्हता, तरी माणसे जवळ होती. थोडक्यात समाधानी होती. अनंत हस्ते कमलावराने, देता किती घेशील दो कराने?

- **अर्चना जगताप**

*Thankyou for being a part of our Journey and we look forward to creating many more memorable moments for our community.*

महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ